# मराठी ही अभिजात भाषाच : प्रा. अनंत राऊत

देगलूर, ता.१ (बातमीदार): मराठी भाषा ही अभिजात भाषा असून तिला केंद्र सरकारने अभिजात भाषेचा दर्जा दिला पाहिजेच, असे प्रतिपादन महाराष्ट्रातील वक्ते प्रा. डॉ. अनंत राऊत यांनी केले..

याप्रसंगी देगलूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. विठ्ठल जंबाले यांनी केले. प्रास्ताविकामधून संभाषण, लेखन, वाचन, श्रवण आणि आविष्कारण इत्यादी स्वर मानवी व्यवहारात मराठीचा वापर कटाक्षाने आणि हेतुपुरस्सर केला पाहिजे, असे मत व्यक्त केले. तसेच समन्वयक डॉ. राजेश्वर दुडुकनाळे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. याप्रसंगी उपप्राचार्य निवृत्ती गोविंदवार, प्रा. लक्ष्मणकुमार सुदाम, प्रा. डॉ. दत्ता शिंदे, प्रा. पस्तापुरे, डॉ. सर्जेराव रणखांब, डॉ. माधव चोले आणि शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तथा विद्यार्थी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी होते.